# प्रेसनोट

दि. २०/०२/२०२३

**शिक्षण विभाग, पुणे येथील वरिष्ठ लेखाधिकारी व कनिष्ठ लेखाधिकारी यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, १२. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४३ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) प्रमिला प्रभाकरराव गिरी, वय ३८ वर्ष, वरिष्ठ लेखाधिकारी, वर्ग - २, शिक्षण विभाग, पुणे.<br>२) अनिल श्रीधर लोंढे, वय ५७ वर्ष, कनिष्ठ लेखाधिकारी, शिक्षण विभाग, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- रुपये. |
| पडताळणी दिनांक | ०८/०२/२०२३, दि. १३/०२/२०२३ व दि. २०/०२/२०२३ |
| सापळा दिनांक | २०/०२/२०२३ |

ठिकाण :- लेखा अधिकारी, शिक्षण विभाग कार्यालय, सिनेगॉक स्ट्रीट, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे शिक्षक असून, त्यांचे सेवापुस्तकावर सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चितीची पडताळणी करुन देण्यासाठी लोकसेवक प्रमिला गिरी यांची लाच मागणी असल्याबाबतची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक क्रमांक १ प्रमिला गिरी यांनी तक्रारदार यांचेकडे सहा हजार रुपयांची लाच मागणी केली. लोकसेवक क्र. २ अनिल लोंढे यानी त्या लाच मागणीस सहाय्य करुन क्र. १ यांचेवतीने पाच हजार रुपये लाच रक्कम स्वीकारल्यावर दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, लष्कर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

Scanned with CamScanner